नि.फौ.ख. क्र.३२७३/२०१६
सरकार वि. कल्याण, न्यायनिर्णय

प्राप्त दिनांक – ०५/१२/२०१६
नोंदणी दिनांक– ०५/१२/२०१६
निकाल दिनांक– २८/०२/२०१८
कालावधी–०१वर्ष,०२महिने,२३ दिवस

## न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.३३, औरंगाबाद, यांचे न्यायालय

*(पिठासिन अधिकारी पी. बी. पवार)*

**नियमित फौजदारी खटला क्र.३२७३/२०१६** **निशाणी क्र.११**

(सी.एन.आर.क्र.एम.एच.ए.यु.–०३–०१६९५८–२०१६)

महाराष्ट्र शासन
द्वारे पोलिस ठाणे सिडको (शहर),
पोलिस ठाणे मुकूंदवाडी, औरंगाबाद .... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

**कल्याण पांडुरंग चौधरी ,**
वय–२२ वर्षे, व्यवसायः मजुरी,
राहणार – दौलत बंगला, पुंडलिक नगर रोड,
औरंगाबाद. ....**आरोपी**

---

अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. यु.बी.वाघ.
आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस.एम.सदावर्ते

---

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक २८/०२/२०१८)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३८१ अन्वये दंडनीय अपराधाचा आरोप ठेवून प्रस्तुतचा खटला चालविण्यात आला.

## अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन

२. वर्दीदार रमेश रामकृष्ण पवार यांचे हार्डवेअर आणि पेंटचे दुकान रमेश ट्रेडर्स या नावाने वाहेगुरु कॉम्प्लेक्स, शॉप नं.७ व ८ पुंडलिक नगर रोड येथे आहे. दि. ०२.१२.२०१५ रोजी ते त्यांच्या दुकानाच्या मागे असलेले गोडावुनमध्ये जावून रंगाच्या बकेट चेक केल्या असता, त्यातील ९ बकेट व एक रॉयल प्लॅस्टीक रंगाचा बॉक्स कमी आढळल्या म्हणून त्याने त्याच्या दुकानात जावून दि. ०१/२२/२०१५ पासून ते आजपावेतो विविध दिवसांच्या त्याच्या गोडावुन मधील सीसीटीव्ही फुटेज चेक केले त्यात त्याला दिसले की, त्याच्या गोडाउन मधील ९ बकेट व एक रॉयल प्लॅस्टीक रंगाचा बॉक्स हे त्याचे येथे काम करणारा कल्याण चौधरी याने काढल्या आहेत.

३. दिनांक ०४.१२.२०१५ रोजी पोलिस ठाणे मुकूंदवाडी, औरंगाबाद येथील ठाणे अंमलदाराकडे वर्दीदाराने तोंडी वर्दी दिली, त्याने ती लेखनीविष्ट केली व त्यावरुन दखलपात्र अपराध घडल्याचे निदर्षनास आल्यामुळे ***पहिली खबर क्रमांक ९१६/२०१५*** वरील कलमाखाली नोंदविण्यात आली. पुढील अन्वेषण **सह. फौजदार श्री. एस.एन.सोनवणे** यांच्याकडे सोपविण्यात आले. अन्वेषणादरम्यान घटनास्थळी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार करण्यात आला व साक्षीदारांचे जवाब नोंदविण्यात आले. आरोपीला अटक करुन व अन्वेषण पूर्ण केल्यानंतर ***कलम १७३(२) फौजदारी प्रक्रिया संहिता*** (यानंतर 'फौ.प्र.सं.') अन्वये अंतिम अहवाल दाखल करण्यात आला.

४. कलम १७३ (२) फौ.प्र.सं. खालील पोलिस अहवाल व त्याबरोबर पाठवलेले कागदपत्रांचा विचार केल्यावर व दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आरोपीने वरील कलमान्वये अपराध केल्याचे गृहीत धरण्यास आधार असल्याने ***कलम २४० फौ.प्र.सं.*** प्रमाणे आरोपी विरुध्द दोषारोपाची लेखी मांडणी करण्यात आली. आरोपीला दोषारोप वाचुन दाखविण्यात आले, ते समजावुन सांगण्यात आले आणि दोषारोप केलेला अपराध तो कबुल करणार आहे की, आपली संपरिक्षा केली जाण्याची मागणी करणार आहे, हे त्याला विचारण्यात आले. आरोपीने

संपरिक्षा करण्याची मागणी केली. त्याप्रमाणे खटला सुरु करण्यात आला.

५. ***कलम २४२ फौ. प्र. सं.*** प्रमाणे अभियोगपक्षातर्फे फक्त वर्दीदार यास तपासण्यात आले. अभियोगपक्षाच्या वर्दीदाराची साक्षीतपासणी केल्यानंतर व आरोपीला त्याचा बचाव देण्यास सांगण्यापूर्वी ***कलम ३१३ (१)(ब) फौ.प्र.सं.*** प्रमाणे आरोपीला त्याच्या विरुध्द दिसणाऱ्या परिस्थीती विशेषांचा खुलासा करणे शक्य व्हावे यासाठी त्याची तपासणी करणे आवश्यक होते. परंतु आरोपीविरुध्द संपरिक्षे दरम्यान गुन्हयात गोवण्या इतपत परिस्थिती निर्माण होईल असा पुरावा आलेला नसल्यामुळे कलम ३१३ (१)(ब) फौ.प्र.सं. प्रमाणे आरोपीची तपासणी घेण्यात आली नाही. आरोपीने सुध्दा ***कलम २४३ फौ.प्र.सं.*** प्रमाणे बचावात साक्षीपुरावा दिला नाही. आरोपीचा बचाव असा आहे की, त्याला प्रस्तुत प्रकरणात खोटे गोवण्यात आले आहे.

६. तथ्यविषयक बाबींचा विचार केल्यानंतर व दोन्ही पक्षांचा सखोल युक्तीवाद ऐकल्यानंतर खालीलप्रमाणे निर्णयीत करावयाचे मुद्दे माझ्या विचाराधीन येत आहे. त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे. निष्कर्षावर पोहचण्यासाठीच्या कारणांचे उहापोह कारणमिमांसा शीर्षकाखाली करण्यात येत आहे;

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने वर्दीदाराचे दुकानाचे मागील गोडावून मधून रंगाचे ९ बकेट व एक रॉयल प्लास्टीक रंगाचा बॉक्स हे वर्दीदाराचे संमतीशिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी केल्याचे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय? | नाही. |
| २. | कोणता आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ करिता

७. सर्व प्रथम हे उल्लेख करणे महत्वाचे आहे की, आरोपीने घटनास्थळ पंचनामा लेखी कबुल केले आहे. ***भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम ५८*** अन्वये लेखी कबुल केलेल्या बाबी किंवा तथ्य शाबीत करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनाम्यावरील दोन्ही पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. तरीसुध्दा सदर पंचनामा कबुलीने शाबीत झाला. यावरुन हे शाबीत झाले की, घटनास्थळ हे दुकानाचे गोडाउन आहे. अशा परिस्थितीत आरोपीने वर्दीदाराचे संमतीशिवाय रंगाचे ९ बकेट व एक रॉयल प्लास्टीक रंगाचा बॉक्स लबाडीच्या इरादयाने चोरी केल्याचे अभियोगपक्षाला सिध्द करणे आहे.

८. वर्दीदाराच्या कथनाप्रमाणे त्याचे थोडेसे सामान हरवले होते. सदरील सामान वेगळया ठिकाणी ठेवले म्हणून समजले नाही. परंतु नंतर निदर्शनास आले असे कथन करुन फिर्यादीतील मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे. याव्यतिरिक्त आरोपीविरुध्द कुठलेही कथन केलेले नाही. वर्दीदाराने पोलिस ठाण्यात वर्दी दिल्याचे मान्य केले. परंतु सदर लेखी वर्दीमध्ये काय नमुद आहे हे तिला माहित नसल्याचे कथन केले आहे. वर्दीदार अभियोगपक्षाच्या कथनास साथ देत नसल्याचे पाहुन सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीवरुन तिला ***भारतीय साक्षीपुरावा अधिनियम कलम १५४*** अन्वये उलटतपासणीमध्ये विचारण्याजोगे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु वर्दीदाराने अभियोगपक्षाचे कथन फेटाळुन लावले व त्याचे आरोपी सोबत तडजोड केल्याचे मान्य केले, त्यामुळे आरोपीविरुध्द गुन्हयात गोवण्या इतपत तोंडी प्रत्यक्ष पुरावा अभिलेखावर आणता आला नाही.

९. आरोपी व वर्दीदाराने मिळुन न्यायालयात पुरसिसद्वारे कळविले की, त्यांनी तडजोड केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे ***फौ.प्र.सं. कलम ३२० (१) व (२)*** मध्ये आपसात मिळविण्यासारखे नसल्यामुळे वर्दीदार व आरोपी दरम्यान

झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. आरोपी व वर्दीदार यांची एकमेकांशी ओळख आहे. त्यामुळे समाजामध्ये क्लेष वाढु नये व समाजात शांतता राहावी या उद्देशाने दोन्ही पक्षांनी तडजोड केल्याचे दिसते. त्यामुळे वर्दीदार याने खोटा साक्षीपुरावा दिला असे म्हणत त्याच्या विरुध्द ***फौ.प्र.सं. कलम ३४४ किंवा ३४०*** प्रमाणे कोणतीही कार्यवाही करणे योग्य होणार नाही. वर्दीदाराने हे मान्य केले आहे की, त्याने आरोपीसोबत प्रकरण आपसात मिटवलेले आहे, त्यांना प्रस्तुत प्रकरण पुढे चालवायचे नाही किंवा कोणतेही साक्षीदार तपासावयाचे नाही. वर्दीदाराने अभियोगपक्षाच्या कथनास साथ दिलेली नाही. याच कारणामुळे सरकारी अभियोक्ता किंवा अभियोगपक्षाने पुढे कोणतेही साक्षीदार तपासले नाही. ***फौ.प्र.सं. कलम ३११*** प्रमाणे या न्यायालयालासुध्दा खटल्याचा निर्णय न्याय्यपणे होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा आवश्यक असल्याचे वाटले नाही. त्यामुळे न्यायालयाद्वारे सुध्दा कोणताही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

१०. वरील कारणमिमांसेवरुन व केलेल्या उहापोहावरुन असे स्पष्ट दिसते की, आरोपीविरुध्द वरील गुन्हा सिध्द करण्यासाठी कोणताही संयुक्तिक, सबळ व विश्वसनीय पुरावा पटलावर आणता आला नाही. अभियोगपक्षाने वरील कोणत्याही गुन्ह्याचे घटक सिध्द केले नाही. त्यामुळे अभियोगपक्ष हे सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे की, आरोपीने वरील गुन्हा केला आहे. त्यामुळे मी वरील मुद्द्यांचे उत्तर नकारार्थी देत आहे.

## <u>मुद्दा क्रमांक २ करिता</u>

११. वरील मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीला त्याच्या विरुध्द लावण्यात आलेल्या सर्व आरोपातुन निर्दोष मुक्त करणे योग्य होईल. वर्दीदार व आरोपी यांच्यात तडजोड झाल्यामुळे ***फौ.प्र.सं. कलम ३५७-अ*** अन्वये प्रस्तुत प्रकरणात पिडीत व्यक्तीला नुकसान भरपाई देण्यासाठी शिफारस जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे करण्यात येत नाही. आरोपीला ***फौ.प्र.सं. कलम ४३७-अ*** प्रमाणे निकटतम अपिल न्यायालया समोर उपस्थीत होण्यासाठी पुढील

सहा महिन्याकरिता प्रतिभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. सदर प्रकरणातील रंगाचे ९ बकेट व एक रॉयल प्लास्टीक रंगाचा बॉक्स हे वर्दीदाराला सुपूर्तनाम्यावर परत मिळाल्याचे सांगितले आहे. अंततः मी मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील अंतिम आदेश पारीत करित आहे;

## आदेश

| | |
|---|---|
| ०१. | आरोपी **कल्याण पांडुरंग चौधरी,** राहणार – दौलत बंगला, पुंडलिक नगर रोड, औरंगाबाद याने ***भारतीय दंड विधान कलम ३८१*** अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केल्याचे सिध्द न झाल्याने ***फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१)*** अन्वये त्याची निर्दोष मुक्तता करण्यात येते व त्याला मुक्त करण्यात येत आहे. |
| ०२. | आरोपीने ***फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७*** अन्वये दिलेले जामीनबंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ०३. | आरोपीने ***फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ*** प्रमाणे निकटतम अपिल न्यायालया समोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरिता प्रतिभुतीसह जमानत पत्र द्यावे. |
| ०४. | न्यायनिर्णय ***फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३५३ (१) (क)*** अन्वये जाहीर करण्यात आले. |

28/2/18

औरंगाबाद
दिनांक– २८/०२/२०१८

(पी. बी. पवार)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.३३, औरंगाबाद.